महाराष्ट्र टाइम्स मरिन ड्राइव्ह point

शनिवार, १२ मार्च २०११

देवळांच्या गावा...

# कथा वालुकेश्वराची

डॉ.तुषार सावडावकर

बाणगंगा म्हणजे श्रीपरशुरामाचं क्षेत्र. बाणगंगापासून गोव्यापर्यंतचा परिसर श्रीपरशुरामाचं क्षेत्र मानलं गेलं आहे. असं म्हटलं जातं की राम, लक्ष्मण वनवासात असताना या क्षेत्री आले होते. ज्यावेळी दशरथराजाचं निधन झालं तेव्हा त्यांचं श्राद्ध व पिंडदान प्रभू रामचंद्रांनी इथेच केलं होतं. तेव्हापासून आजपर्यंत इथे पिंडदानाचं कार्य चालू आहे. इथे पिंडदान केल्यास किंवा अस्थी विसर्जन केल्यास पवित्र आत्म्यास मुक्ती मिळते अशी भाविकांची श्रद्धा आहे.

वाळकेश्वर मंदिराबाबत एक आख्यायिका प्रचलित आहे. 'वालुका' (वाळू) आणि 'ईश्वर' या दोन शब्दांचा संयोग होऊन 'वाळूकेश्वर' हा शब्द बनला आहे. पुढे त्याचा अपभ्रंश होऊन 'वाळकेश्वर' हे नाव त्या मंदिराला आणि त्या विभागाला प्राप्त आलं. 'वाळकेश्वर'बद्दल एक दंतकथा असून ती श्री महादेवाशी संबंधित आहे.

रावणाने जेव्हा सीतेचं अपहरण केलं तेव्हा राम आणि लक्ष्मण पंचवटी सोडून सीतेला शोधायला निघाले. सीतेला शोधत शोधत ते इथे आले. याचदरम्यान त्यांची गौतमऋषींबरोबर भेट झाली. रामाने गौतमऋषींना काही मार्ग दाखवण्याची विनंती केली. तेव्हा गौतमऋषींनी त्यांना शिवाची उपासना व पूजा करण्यास सुचवलं. त्याप्रमाणे श्रीरामाने लक्ष्मणाला काशीला जाऊन शिवलिंग आणायला सांगितलं. लक्ष्मणाने काशीला प्रस्थान केलं. बराच काळ जाऊनही लक्ष्मण परत न आल्यामुळे गौतम ऋषींनी रामाला वाळूचं लिंग बनवून त्याची पूजा करण्यास सुचवलं. त्यांची आज्ञा प्रमाण मानून रामाने लगेच वाळूचं शिवलिंग बनवलं आणि पूजेला सुरुवात केली. रामाने निष्ठेने केलेल्या पूजेचं फलित म्हणून शंकराने प्रगट होऊन तुझी सर्व कामं यशस्वी होऊन सर्व इच्छा पूर्ण होतील, असा आशीर्वाद दिला.

काही कालावधीनंतर लक्ष्मणाचं आगमन झालं. परंतु तोपर्यंत वालुकामय लिंगाची प्राणप्रतिष्ठासहित स्थापना झाली होती. या लिंगाला 'वालुकेश्वर' असं संबोधण्यात आलं व लक्ष्मणाने काशीवरून आणलेल्या लिंगाला 'लक्ष्मणेश्वर' असं नाव पडलं. वाळकेश्वरच्या सध्याच्या देवळात असलेलं शिवलिंग मात्र वाळूचं नाही. आता तिथे जे शिवलिंग आहे ते लक्ष्मणाने आणलेलं लिंग असल्याची लोकांची श्रद्धा आहे.



वालुकेश्वर मंदिर हे अतिशय प्राचीन आणि जागृत देवस्थान असून १७१५ मध्ये रामजी कामत यांनी मंदिरांचा जीर्णोद्धार केला. १७५० मध्ये मंदिराचा पुन्हा जीर्णोद्धार करण्यात आला. सध्या या मंदिराचा कारभार गौड सारस्वत ब्राह्मण टेम्पल ट्रस्ट पाहतं.

देवळाचा सभामंडप ५० फूट लांब आणि २५ फूट रुंद आहे. देवळाचा गाभारा २४ फूट रुंद चौकोनी संगमरवरी दगडापासून बनवला आहे. मुख्य दरवाज्यापासून मंदिराच्या आतल्या गाभाऱ्यापर्यंत असंख्य पितळेच्या घंट्या बांधण्यात आल्या आहेत. या मंदिराबाबत आणखी एक आख्यायिका आहे. हे मंदिर बांधताना तसंच मंदिराचं खोदकाम करत असताना खोदलेल्या भागात रक्ताचे थेंब आढळले. अधिक खणलं असता रक्ताच्या थेंबाजवळ शिवलिंग आढळलं. त्याच लिंगाची मंदिरात स्थापना करण्यात आली. या लिंगाला पितळी कवच बसवलं आहे. लक्ष्मणाने काशीहून आणलेलं शिवलिंग हेच असून त्याची स्थापना झाल्यापासून वालुकेश्वर मंदिराला लक्ष्मणेश्वर मंदिर अस नाव पडलं, असं भाविकांचं म्हणणं आहे. सकाळी साडेसात व संध्याकाळी साडेसात वाजता देवळात आरती होते व दुपारी नैवेद्य दाखवला जातो. त्रिपुरी पौर्णिमा तसंच महाशिवरात्र या महत्त्वाच्या दिवशी अभिषेक व पालखीची भव्य मिरवणूक काढली जाते. या सोहळ्याला हजारो भाविकांची उपस्थित राहतात.

वालुकेश्वराचं मंदिर पूर्वाभिमुख असून पूर्वेला तलाव आहे. शिवलिंग पश्चिमेला असून त्याचा पिठीकेचा निमुळता भाग बरोबर उत्तर दिशेला आहे. देशभरात शिवलिंगं ज्या ज्या ठिकाणी शाळुंका आणि पिठीका स्वरूपात स्थापन झाली, त्या ठिकाणी पिठीकेचा निमुळता भाग नेहमी उत्तरेलाच केला गेला. त्याकाळी होकायंत्राचा शोध लागला नव्हता. एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात जाताना दिशा कळावी म्हणून पिठीकेच्या निमुळत्या भागाच्या दिशेला उत्तर दिशा समजलं जाई. शिवलिंगाला कधीच पूर्ण प्रदक्षिणा घालत नाही. कारण ब्रह्म हीच शिवाची पिंडी आहे. ब्रह्माभोवती पूर्ण प्रदक्षिणा घालणं शक्य नाही. म्हणून पिंडीभोवती पूर्ण प्रदक्षिणा घालत नाही.

श्री वालुकेश्वर मंदिराच्या बाजूला दीपस्तंभ, विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, काशीमठ संस्थान, कवळे मठ, महालक्ष्मी संतोषी माता मंदिर, बालाजी मंदिर, जगन्नाथ मंदिर, सिद्धेश्वर मंदिर, परशुराम मंदिर, जाब्रेश्वर महादेव मंदिर, रामेश्वर मंदिर, ओमकारेश्वर मंदिर, लक्ष्मीनारायण मंदिर, गणपती मंदिर असून प्रत्येक मंदिराला समृद्ध ऐतिहासिक वारसा आहे.




mtartedit@gmail.com